# ६. सेवा सहकारी संस्था

(Service Co-operative Society)


| | | | |
|---|---|---|---|
| ६.१ | प्रस्तावना | ६.५ | सारांश |
| ६.२ | अर्थ व व्याख्या | ६.६ | महत्वाच्या संज्ञा |
| ६.३ | वैशिष्ट्ये | ६.७ | स्वाध्याय |
| ६.४ | कार्ये | | |


## ६.१. प्रस्तावना : (Introduction)

शेतकऱ्यांच्या आर्थिक व जीवनावश्यक गरजा भागविणे आणि शेती उत्पादन वाढविणे यासाठी विविध सेवा पुरविणाऱ्या संस्था म्हणजे सेवा सहकारी संस्था होय. सेवा सहकारी संस्थांना विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, शेतकरी सेवा सहकारी संस्था किंवा प्राथमिक सेवा सहकारी संस्था असेही म्हणतात. या संस्था सभासदांना फक्त कर्जपुरवठा न करता विविध सेवासुद्‌धा उपलब्ध करून देतात.

भारतात सेवा सहकारी संस्थांची वाटचाल सन १९५८ पासून सुरू झाली. सेवा सहकारी संस्थांचा विकास प्राथमिक पतपुरवठा सहकारी संस्था ते बहुउद्‌देशीय संस्था, बहुउद्‌देशीय संस्था ते मोठ्या आकाराच्या संस्था, मोठ्या आकाराच्या संस्था ते सेवा सहकारी संस्था या टप्प्यातून झालेला दिसून येतो.

भारतात सन १९०४ पासून प्राथमिक पतपुरवठा संस्था मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या त्या फक्त कर्जपुरवठा करणे या हेतूनेच स्थापन झालेल्या होत्या. पतपुरवठा व्यतिरिक्त इतर गरजा भागविण्याच्या दृष्टीने या संस्था असमर्थ ठरल्या. पतपुरवठा संस्थांची पुनर्रचना करून त्यांचे रुपांतर बहुउद्‌देशीय संस्थांमध्ये केले जावे असा विचार पुढे आला. सन १९४७ नंतर प्राथमिक पतपुरवठा संस्थांचे रुपांतर बहुउद्‌देशीय संस्थांमध्ये करण्यात आले.

बहुउद्‌देशीय संस्थांच्या कार्यात अनेक दोष दिसून आल्याने अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने (१९५४) बहुउद्‌देशीय संस्थांऐवजी मोठ्या आकाराच्या संस्था स्थापन कराव्यात अशी सूचना केली. मोठ्या आकाराच्या संस्था एका खेड्यापुरत्या मर्यादित न ठेवता त्या परिसरातील इतर खेडी मिळून संस्थेची स्थापना करावी. जेणेकरून त्या अर्थक्षम होतील या विचाराने सरकारने मोठ्या आकाराच्या सहकारी संस्था स्थापनेला उत्तेजन दिले. परंतु मोठ्या आकाराच्या संस्थांऐवजी छोट्या आकाराच्या संस्था योग्य ठरतील असे मत एम. एल. डार्लिंग यांनी मांडले. सन १९५८ मध्ये राष्ट्रीय विकास महामंडळाने देखील अशाच प्रकारच्या संस्थांच्या स्थापनेवर भर दिला. वैकुंठलाल मेहता समितीनेदेखील सेवा सहकारी संस्थेची स्थापना गावपातळीवर करावी अशी सूचना केली. देशाच्या ग्रामीण विकासात सेवा सहकारी संस्थांना खूपच महत्त्व आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आपण सेवा सहकारी संस्थेबाबत अभ्यास करणार आहोत.

## ६.२ अर्थ व व्याख्या : (Meaning and Definition)

**अर्थ –** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या शेतीविषयक विविध प्रकारच्या गरजा असतात. उदा. शेतीला कर्जपुरवठा उपलब्ध होणे, सुधारीत बी बियाणे, खते, कीटकनाशके यांची सोय होणे त्याचबरोबर जीवनावश्यक अनेक वस्तूंचीही गरज असते. उदा. किराणा माल, कपडे, साखर, गहू, तांदूळ इ. शेतीविषयक आणि जीवनावश्यक गरजा भागविण्याच्या उद्‌देशाने ग्रामीण पातळीवर सहकारी तत्त्वावर या संस्था स्थापन झालेल्या आहेत त्यांना सेवा सहकारी संस्था असे म्हणतात.

❑ **व्याख्या :**


१) बी मुखर्जी – '' आपल्या समान गरजा भागविण्यासाठी आणि कृषी उत्पादन वाढविण्यासाठी ग्रामस्थांनी परस्पर सहाय्य आणि परस्पर सहकार्याने निर्माण केलेली सहकारी संघटना म्हणजे सेवा सहकारी संस्था होय.''

२) ''समान आर्थिक गरजांच्या पूर्ततेसाठी व शेती उत्पादन वाढविण्यासाठी शेतीपूरक वस्तू व सेवा उपलब्ध करण्याच्या उद्‌देशाने लोकांनी स्वेच्छेने स्थापन केलेली संस्था म्हणजे सेवा सहकारी संस्था होय.''

३) समाज कल्याण मंत्रालय यांनी केलेली व्याख्या– ''समान आर्थिक गरजांच्या पुर्ततेसाठी आणि कृषी उत्पादन वाढविण्यासाठी लोकांनी स्वेच्छेने परस्पर सहाय्यासाठी आणि परस्पर सहकार्यासाठी निर्माण केलेली संघटना म्हणजे सेवा सहकारी संस्था होय.''

वरील व्याख्येवरुन असे स्पष्ट होते की, प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली ही प्राथमिक संस्था होय. ग्रामीण जनतेशी या संस्थांचा प्रत्यक्ष संबंध असतो. शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी विविध सेवा या संस्था पुरवितात.

## ६.३ सेवा सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये : (Features of Service Co-operative Society)




१) **सभासदत्व :** संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना सेवा सहकारी संस्थेचे सभासदत्व खुले व ऐच्छिक असते. साधारणपणे १००० लोकवस्तीच्या खेडयासाठी एक सेवा सहकारी संस्था स्थापन करण्याचे धोरण आहे. गावातील किंवा कार्यक्षेत्रातील कोणत्याही व्यक्तिला संस्थेचे सभासद होता येते. शेतकरी, कारागीर व लहान व्यावसायिकांना सभासदत्व दिले जाते.

२) **सभासदांची जबाबदारी :** सेवा सहकारी संस्थेतील सभासदांची जबाबदारी मर्यादित असते. संस्थेला काही कारणांमुळे आर्थिक नुकसान झाल्यास सभासदांची जबाबदारी त्यांनी खरेदी केलेल्या भागांच्या दर्शनी किंमती इतकी मर्यादित असते. सभासदाला त्याच्या खाजगी मालमत्तेतून झालेल्या नुकसानीची भरपाई करावी लागत नाही. या संस्था मर्यादित जबाबदारीच्या तत्वावर स्थापन झालेल्या असतात.

३) **भागाची दर्शनी किंमत :** सेवा सहकारी संस्थेच्या भागाची दर्शनी किंमत अल्प असते. साधारणत: रु १० किंमत असते. शेतकरी, कारागीर, लहान व्यावसायिक आदींना सभासद होता यावे या हेतूने भागाची किंमत अल्प ठेवली जाते.

४) **लोकशाही व्यवस्थापन :** सहकारी संस्थेचे संचालक मंडळ/कार्यकारी समिती/व्यवस्थापन समिती व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारते. सभासदांमधून संचालक मंडळ निवडले जाते. कार्यालयीन कामकाजासाठी गटसचिवाची / सचिवाची नेमणूक केली जाते. संस्थेचे व्यवस्थापन हे लोकशाही पद्धतीने केले जाते. सर्व सभासदांची सर्वसाधारण सभा सर्वोच्च असते. या सभेतील घेतलेले निर्णय अंतिम असतात. इतर महत्त्वाचे निर्णय व संस्थेची धोरणे सर्वसाधारण सभेच्या संमतीने घेतली जातात.

५) **संस्थेची स्थापना :** सेवा सहकारी संस्थेची स्थापना इतर सहकारी संस्थेप्रमाणेच सहकारी कायद्यानुसार केली जाते. पूर्वीच अस्तित्वात असलेल्या एकउद्देशिय किंवा मोठया आकाराच्या प्राथमिक संस्थांची फेररचना करून सेवा सहकारी संस्था निर्माण करण्यात आलेल्या आहेत. एखाद्या गावाची लोकसंख्या कमी असल्यास दोन-तीन गावासाठी एक संस्था स्थापन केली जाते. काही वेळा स्वतंत्रपणे अशा संस्था स्थापन केल्या जातात.

६) **भांडवल उभारणी :** सेवा सहकारी संस्था या भांडवलाची उभारणी पुढील मार्गाने करतात. भागांची विक्री, ठेवी स्वीकारणे, सभासद प्रवेश फी, राखीव निधी, देणग्या व अनुदान, राज्यसरकार, व्यापारी बँका, ग्रामीण विकासासाठी कार्य करणाऱ्या वित्तीय संस्थांकडून भांडवल उभारणी केली जाते.

७) **जीवनावश्यक वस्तूंचे वितरण :** सेवा सहकारी संस्थेमार्फत सभासदांना जीवनावश्यक वस्तू उदा. धान्य, साबण इ. वस्तू सवलतीच्या दरात उपलब्ध करून देतात. तसेच आधुनिक काळात या संस्था ग्रामीण भागात विविध वस्तू भांडार म्हणून कार्य करतात. सभासदांना सवलतीच्या दराने अशा वस्तू मिळाल्यामुळे बचत वाढून जीवनमान उंचावण्यास मदत होते.

८) **मार्गदर्शन व सल्ला :** सेवा सहकारी संस्था सभासदांना कृषी उत्पादन, शेती जोडधंदा/उद्योग अशा बाबतीत सल्ला देण्याचे कार्य करतात. शेतीसाठी वापरावे लागणारे आधुनिक तंत्रज्ञान, खते, कीटकनाशके यांच्या वापरासाठी, देखभाल व दुरुस्तीसाठी माहिती व मार्गदर्शन या संस्था करतात.

९) **शेतीविषयक सेवा पुरविणे :** सेवा सहकारी संस्था शेतकऱ्यांना शेतीविषयक सेवा उपलब्ध करून देण्याचे कार्य करतात. उदा. खते, बी-बियाणे, कीटकनाशके, पशुखाद्य पुरविण्याचे कार्य संस्था करतात. तसेच गोदामांच्या सोयी पुरविणे, शेतमालाच्या विपणनाची व्यवस्था करणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे यासारख्या सेवा या संस्था पुरवितात.

१०) **आधुनिक तंत्राचा वापर :** शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी सेवा सहकारी संस्था आपल्या सभासद शेतकऱ्यांना नवनवीन संशोधनाची माहिती पुरवितात. तसेच नवीन यंत्रसामुग्री व तंत्रज्ञान त्यांना उपलब्ध करून देतात. शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी यंत्रसामुग्री भाडे तत्त्वावर उपलब्ध करून देतात. शेतीची उत्पादकता वाढविणे हा उद्देश यामागे असतो.



**कृती–**

१) **आपल्या परिसरातील सेवा सहकारी संस्थेला भेट देऊन संस्थेच्या कामकाजाची माहिती मिळवा.**

## ६.४ सेवा सहकारी संस्थेची कार्ये – (Functions of Service Co-operative Society)




१) **कर्जपुरवठा करणे :** सेवा सहकारी संस्था शेतकरी व लहान व्यावसायिकांना त्यांच्या व्यावसायिक विकासासाठी आवश्यक असणारा अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करतात. सभासद शेतकऱ्यांना पिकांच्या तारणावर कर्ज पुरवठा करणे, रोख रक्कम देण्याऐवजी बी-बियाणे, खते, जंतुनाशके इत्यादी वस्तूंचा पुरवठा केला जातो. त्याचबरोबर शेतमालावर उचल रकमा या संस्था देतात.

२) **शेतीची साधने पुरविणे :** शेतकऱ्यांना शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी आवश्यक असणारी सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, सुधारीत अवजारे व अन्य पूरक साधने सवलतीच्या दराने उपलब्ध करून देतात. याशिवाय यांत्रिक अवजारे भाडे तत्त्वावर उपलब्ध करून देतात आणि यांत्रिक अवजारांची दुरुस्ती व देखभाल करतात.

३) **जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा :** लहान गावांमध्ये शासन पुरस्कृत स्वस्त धान्यांची दुकाने चालविण्याची जबाबदारी सेवा सहकारी संस्थांकडे सोपविली जाते.त्यांच्याव्दारे सभासदांना जीवनावश्यक वस्तूंचा सवलतीच्या दराने पुरवठा करण्यात येतो. अशा सेवा पुरवल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची कामे वेळेवर पार पाडता येतात. आणि शेती व्यवसायाकडे लक्ष देता येते.

४) **ग्रामीण विकासाला चालना :** सेवा सहकारी संस्था शेतकऱ्यांच्या शेती व्यवसायाच्या वाढीसाठी साहाय्य करतात. त्यांना लागणारा कच्चा माल व अवजारे उपलब्ध करून देतात. तसेच नवीन तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध करून देऊन त्यांच्या व्यवसायाची उत्पादकता व कार्यक्षमता वाढविण्यास साहाय्य करतात. याशिवाय ग्रामीण भागातील इतर कारागिरांना कच्च्या मालाचा पुरवठा करून, ग्रामीण विकासाला चालना दिली जाते. त्यातून रोजगार निर्मिती होते.

५) **कर्जवसुली करणे :** सेवा सहकारी संस्था सभासदांना दिल्या जाणाऱ्या कर्जावर लक्ष ठेवून असतात. दिलेल्या कर्जाचा वापर सभासद शेतकरी कशा पद्धतीने करतात यावर लक्ष दिले जाते. उत्पादक कार्यासाठी कर्जाचा वापर व्हावा यासाठी संस्थेकडून कर्जाच्या वापरावर नियंत्रण ठेवले जाते. तसेच कर्जाची वसुली योग्य पद्धतीने करण्यासाठी प्रयत्न केले जातात. शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाच्या रकमा त्यांनी अनुत्पादक कामासाठी वापरू नये यासाठी सेवा सहकारी संस्था विशेष प्रयत्न करतात.

६) **सभासदांची बचत वाढविणे :** सभासदांना दिलेले कर्ज शेती उत्पादन वाढविण्यासाठी दिले जाते. ग्रामीण भागात व्यवसाय करणारे शेतकरी, व्यावसायिक यांना काटकसरीची सवय लावून त्यांची बचत वाढविली जाते. यातून संस्थेलाही ठेवी जमा होण्यास मदत होते. परिणामी शेती उत्पादनात वाढ होऊन सभासदांचे व्यक्तिगत उत्पन्न वाढते.

७) **शेती विकासाचे कार्यक्रम व इतर योजना राबविणे :** सेवा सहकारी संस्थेच्या वतीने ग्रामीण भागात शेती व्यवसायाचा विकास घडवून आणण्यासाठी, शेती विकासाचे विविध कार्यक्रम राबविले जातात. उदा. पडीक जमीन सुधारणे, सामुदायिकरित्या जमीन लागवडीखाली आणणे, सुधारीत बी-बियाणे,उत्पादनात वाढ करणे, कंपोस्ट खत निर्माण करणे इ. विविध कार्यक्रम राबवून शेतीचा विकास करता येतो.

८) **प्राथमिक खरेदी विक्री संघाचा प्रतिनिधी म्हणून कार्य :** प्राथमिक सहकारी संस्थेचा प्रतिनिधी म्हणून सेवा सहकारी संस्था अनेक प्रकारची कार्य करतात. उदा. मालाचे एकत्रीकरण करणे, प्रतवारी, साठवणूक करणे इ. कार्ये या संस्था करीत असतात.

९) **छोट्या उद्योगांना चालना :** ग्रामीण विकासाशी संबंधित छोट्या उद्योगांना चालना देण्याचे कार्य ही संस्था करते. दुग्ध व्यवसाय, शेळी मेंढी पालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग यासारख्या छोट्या उद्योगांना कर्जपुरवठा केला जातो. या उद्योगांना चालना मिळाल्याने ग्रामीण भागातील लोकांचे शेतीवरील अवलंबित्व कमी होते व रोजगारात वाढ होते.

१०) **बाजारातील गैरव्यवहारांना आळा घालणे :** शेतमालासाठी चांगल्या किंमती मिळवून देऊन त्याद्वारे सभासदांची उत्पादन क्षमता वाढविण्याचे कार्य या संस्था करतात. शेतकरी सभासदांचा माल एकत्र करून सेवा सहकारी संस्थेमार्फत विकला जातो. परिणामी बाजारातील दलाल व मध्यस्थांची साखळी नष्ट होते. त्यांच्याकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक थांबते आणि बाजारातील गैरव्यवहारांना आळा बसतो.



कृती–

**२) सेवा सहकारी संस्था ग्रामीण विकासात कशा उपयुक्त ठरतात याबाबत आपल्या शिक्षकांशी चर्चा करा.**

**फरक : सेवा सहकारी संस्था व सहकारी पतपुरवठा संस्था**

| अ.क्र. | मुद्दे | सेवा सहकारी संस्था | सहकारी पतपुरवठा संस्था |
|---|---|---|---|
| १ | अर्थ | ग्रामीण भागात शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या शेती उत्पादन वाढीसाठी शेतीपूरक वस्तू व सेवांचा पुरवठा करण्यासाठी स्थापन झालेली संस्था म्हणजे सेवा सहकारी संस्था होय. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंकडून तारण स्वीकारून त्यांना कर्जपुरवठा करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय. |
| २ | स्थापना | ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी स्थापन झालेली असते. | ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कारागिरांना कर्जपुरवठा करण्यासाठी स्थापन झालेली असते. |
| ३ | सभासदत्व | संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी सभासद असतात. | संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी, शेतमजूर, लघुउद्योजक, कारागीर सभासद असतात. |
| ४) | उद्देश | शेतकरी व सभासदांना विविध सेवा पुरविणे. | सभासदांना वाजवी व्याजदराने कर्जपुरवठा करणे. |
| ५) | कार्यक्षेत्र | सेवा सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र एक किंवा दोन गावापुरते मर्यादित असते. | सहकारी पतपुरवठा संस्थेचे कार्यक्षेत्र गावपातळी अथवा चार ते पाच कि.मी. परिसरात येणाऱ्या गावापुरते मर्यादित असते. |
| ६) | कार्ये | शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणे, सुधारीत बी-बियाणे, खते कीटकनाशके व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा इ. कार्ये करतात. | कर्जपुरवठा करणे, ठेवी स्वीकारणे, कर्जाच्या वापरावर नियंत्रण इ. कार्ये करतात. |

## ६.५ सारांश

**सेवा सहकारी संस्था –** जीवनावश्यक व शेतीविषयक गरजा भागविण्याच्या उद्देशाने ग्रामीण पातळीवर सहकारी तत्वानुसार ज्या संस्था स्थापन झालेल्या असतात त्यांना सेवा सहकारी संस्था असे म्हणतात.

### सेवा सहकारी संस्थेची वैशिष्टये

१) सभासदत्व
२) सभासदाची जबाबदारी
३) भागाची दर्शनी किंमत
४) लोकशाही व्यवस्थापन
५) संस्थेची स्थापना
६) भांडवल उभारणी
७) जीवनावश्यक वस्तूंचे वितरण

८) मार्गदर्शन व सल्ला
९) शेतीविषयक सेवा पुरविणे
१०) आधुनिक तंत्राचा वापर

### ❑ सेवा सहकारी संस्थेची कार्ये

१) कर्जपुरवठा करणे
२) शेतीची साधने पुरविणे
३) जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा
४) ग्रामीण विकासाला चालना
५) कर्जवसुली करणे
६) सभासदांची बचत वाढविणे
७) शेती विकासाचे कार्यक्रम व इतर योजना राबविणे
८) प्राथमिक खरेदी विक्री संघाचा प्रतिनिधी म्हणून कार्य
९) छोट्या उद्योगांना चालना
१०) बाजारातील गैरव्यवहारांना आळा घालणे

## ६.६ महत्वाच्या संज्ञा

१) **व्यवस्थापन समिती –** सभासदांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा समूह.
२) **भाग भांडवल –** भागांची विक्री करून जमा झालेली रक्कम.
३) **अल्प मुदतीचे कर्ज –** ३ ते १५ महिने मुदतीसाठी दिले जाणारे कर्ज.
४) **मध्यम मुदतीचे कर्ज –** १ ते ५ वर्षे मुदतीसाठी दिले जाणारे कर्ज.
५) **भाग –** सहकारी संस्थेच्या एकूण भांडवलातील लहान हिस्सा किंवा अंश.

## ६.७ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) सेवा सहकारी संस्थेचे व्यवस्थापन ----- पद्धतीने चालते.
अ) लोकशाही ब) हुकूमशाही क) भांडवलशाही

२) सेवा सहकारी संस्था ----- पातळीवर कार्य करतात.
अ) जिल्हा ब) गाव क) तालुका

३) ज्या गावाची लोकसंख्या किमान ----- आहे त्या गावात एक सेवा सहकारी संस्था असावी.
अ) ५०० ब) १००० क) २०००

४) भारतात सेवा सहकारी संस्थेची वाटचाल .........साली सुरू झाली.

अ) १९५८ ब) १९६० क) १९६२

५) सेवा सहकारी संस्थेतील सभासदांची जबाबदारी .......असते.

अ) मर्यादित ब) अमर्यादित क) सामुदायिक

## ब) योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) सेवा सहकारी संस्था | १) औद्योगिक सेवा पुरविणे. |
| ब) शेती उत्पादकतेत वाढ | २) जुनाट तंत्राचा वापर |
| क) सेवा सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र | ३) शेती विषयक सेवा पुरविणे |
| | ४) गाव पातळी |
| | ५) जिल्हा पातळी |
| | ६) आधुनिक तंत्राचा वापर |

## क) खालील विधानांसाठी एक शब्द / शब्दसमूह लिहा.

१) सभासदांना सेवा पुरविण्यासाठी स्थापन झालेली संस्था

२) सेवा सहकारी संस्थांचा कारभार ज्या तत्वानुसार चालतो ते तत्त्व

३) सेवा सहकारी संस्था सभासदांना या मुदतीचा कर्जपुरवठा करतात

४) सेवा सहकारी संस्था सभासदांना या वस्तूंचा पुरवठा करतात

## ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.

१) सेवा सहकारी संस्था दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करतात.

२) सेवा सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र गावपातळीवर असते.

३) जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे हे सेवा सहकारी संस्थेचे कार्य असते.

४) सेवा सहकारी संस्थेमुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत.

## इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) सेवा सहकारी संस्था .......... पातळीवर कार्य करतात.

२) शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी .......... तंत्राचा वापर केला जातो.

३) सेवा सहकारी संस्थेमुळे बाजारातील .......... ला आळा बसतो.

४) सेवा सहकारी संस्थेतील सभासदांची जबाबदारी ............. असते.

५) सेवा सहकारी संस्था सभासदांना जीवनावश्यक वस्तू ........... दरात उपलब्ध करून देतात.

### (फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) गावपातळी | |
| २) | सेवा सहकारी संस्थांची वाटचाल |
| ३) सभासदांची जबाबदारी | |

मर्यादित, १९५१, सेवा सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र, १९५८, अमर्यादित

### ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सेवा सहकारी संस्था म्हणजे काय ?

२) सेवा सहकारी संस्थेचे भांडवल उभारणीचे मार्ग कोणते ?

३) सेवा सहकारी संस्थेची व्यवस्थापन पद्धती कोणती ?

४) सेवा सहकारी संस्था शेतीविषयक कोणत्या सेवा पुरविते ?

५) सेवा सहकारी संस्थेचे सभासदत्व कोणत्या व्यक्तिंना दिले जाते ?

### ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) सेवा सहकारी संस्था दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करतात.

२) सेवा सहकारी संस्था जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा जास्त किंमतीला करतात.

३) सेवा सहकारी संस्थेची स्थापना राज्य पातळीवर केली जाते.

### प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१) सेवा सहकारी संस्था

२) भागभांडवल

३) अल्प मुदतीचे कर्ज

### प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.

१) सेवा सहकारी संस्थेमुळे रोजगारात वाढ झाली आहे याबाबत आपले मत व्यक्त करा.

२) सेवा सहकारी संस्थेमुळे शेती क्षेत्रात आधुनिक तंत्राचा वापर वाढला आहे याबाबत आपले मत व्यक्त करा.

### प्र.४ फरक स्पष्ट करा.

१) पतपुरवठा सहकारी संस्था व सेवा सहकारी संस्था

**प्र.५ टीपा लिहा.**

१) सेवा सहकारी संस्था

२) सेवा सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये

**प्र.६ कारणे द्या.**

१) सेवा सहकारी संस्थांमुळे शेतीची उत्पादकता वाढते.

**प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सेवा सहकारी संस्थेचा अर्थ व व्याख्या लिहा.

२) सेवा सहकारी संस्थेची कार्ये लिहा.

**प्र.८ दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) सेवा सहकारी संस्थेची व्याख्या सांगून सेवा सहकारी संस्थेची कार्ये स्पष्ट करा.

२) सेवा सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

◆◆◆